मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहराला टँकर लॉबीचा वेढा!

## मागील साडेचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा : गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांना टँकरचा आधार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेकडून शहरातील गृहनिर्माण संस्थांना पाणीपुरवठा करण्यात येत असला, तरी सद्य:स्थितीत ते पाणी पुरत नाही. त्यामुळे शहरातील सर्वच भागांतील गृहनिर्माण संस्थांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. शहराला टँकर लॉबीने वेढा घातला असून, महापालिकेने खासगी व्यावसायिकांवर नियंत्रण नसल्याचे सांगत हात झटकले आहेत. टँकर व्यावसायिक खासगी विहिरी आणि बोअरवेलमधून पाणी घेत असल्याचा पालिकेचा दावा आहे.



पिंपरी-चिंचवड शहराची झपाट्याने वाढ होत आहे. मोठमोठ्या गृहनिर्माण संस्था विकसित होत आहेत. परिणामी, शहराची लोकसंख्या २७ लाखांवर गेली आहे. पाण्याची गरज भागवण्यासाठी महापालिका प्रतिदिन पवना धरणातून ५२० दशलक्ष लिटर (एमएलडी), आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून १५ असे ६१५ दशलक्ष लिटर पाणी उचलते. यांपैकी ४० टक्के पाण्याची गळती व चोरी होत असल्याचे प्रशासन पाच वर्षांपासून सांगत आहे. मात्र, त्यावर ठोस उपाय अद्याप सापडत नाही, अशी स्थिती आहे. मागील साडेचार वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. तोही अनियमित, अपुरा व कमी दाबाने होतो. त्यामुळे गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे.

लहान गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांना १३५ लिटर प्रतिदिन प्रतिमाणसी, तर मोठ्या संस्थांमधील रहिवाशांना ९० लिटर पाणी दिले जाते. जास्त पाणी लागणाऱ्या संस्थांनी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील प्रक्रिया झालेल्या पाण्याचा वापर करणे बंधनकारक असल्याचे पालिकेकडून सांगितले जाते. मात्र, पालिकेकडून मानकाप्रमाणे प्रतिदिन प्रतिमाणसी १३५ लिटरप्रमाणे पाणी मिळत नसल्यानेच आम्हाला टँकरद्वारे पाणी घ्यावे लागते, असा गृहनिर्माण संस्थाधारकांचा आरोप आहे.

पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, रावेत, पुनावळे, वाकड, ताथवडे, चिखली, मोशी भागातील गृहनिर्माण संस्थांना उन्हाळ्यात पूर्णपणे टँकरवर अवंलबून राहावे लागते. एप्रिल महिना सुरू होताच बोअरवेल कोरडे पडतात. परिणामी, टँकरच्या पाण्याशिवाय पर्याय राहत नाही. टँकर लॉबीचा सुळसुळाट झाल्याचे दिसून येत आहे. टँकरमाफियांनी पाण्याच्या व्यवसायातून कोट्यवधी रुपये कमाविले आहेत. त्यामुळे ही पाणीटंचाई या लॉबीला पोसण्यासाठी केली जात असल्याचा आरोप होत आहे.

### जुलैपर्यंत पुरेल एवढा धरणात साठा

» पवना धरणात आजमितीला २४.५२ टक्के, तर आंद्रा धरणात २९.८५ टक्के पाणीसाठा आहे. १५ जुलैपर्यंत पुरेल एवढा हा पाणीसाठा आहे. भामा आसखेड धरणाचे पाणी येत नाही, तोपर्यंत आम्ही पाणी पुरविणार असे बांधकाम व्यावसायिकांनी महापालिकेला लिखित दिले. परंतु, पाणी देत नाहीत. अशा व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करावेत. टँकरमुळे संस्थांचे आर्थिक नियोजन कोलमडल्याचे चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी सांगितले.

> पाणीपुरवठा विस्कळीत झाला तरच टँकरद्वारे पाणी दिले जाते. महापालिकेचे आठ टँकर आहेत. जास्तीचे पाणी लागते म्हणून खासगी गृहनिर्माण संस्था टँकरद्वारे पाणी घेतात. विहिरी, बोअरवेलमधून टँकरवाले पाणी घेतात. कोणी काय व्यवसाय करावा, किती दराने करावा यावर महापालिका नियंत्रण ठेवू शकत नाही.
> **- श्रीकांत सवणे, मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग, महापालिका, पिंपरी-चिंचवड.**

# डेडलाइन संपली, अद्यापही नालेसफाई अपूर्णच

## पावसाळापूर्व कामे संथ गतीने सुरु : 90 टक्के नालेसफाई झाल्याचा महापालिकेच्या आरोग्य विभागाचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत लहान-मोठे असे १४४ नाले आहेत. या नाल्यांची पावसाळ्यापूर्वी यांत्रिक पद्धतीने साफसफाई करण्यात येत असून, ३१ मेच्या मुदतीत नालेसफाई पूर्ण झाली नाही. ९० टक्के नालेसफाई झाल्याचा दावा महापालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे. मात्र, पावसाळापूर्व कामे संथ गतीने सुरू असून, मे महिना संपत आला, तरी अद्यापही नालेसफाई पूर्ण झाली नाही.

महापालिकेकडून दर वर्षी पावसाळा पूर्व कामांतर्गत शहरातील नाले, ओढे, पावसाळी गटारे, वाहिन्यांची स्वच्छता केली जाते. मात्र, ही कामे पावसाळा तोंडावर आला, तरी सुरूच असतात. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये २ ते ११ मीटर रुंदीचे शंभर किलोमीटर अंतराचे १४४ नैसर्गिक नाले आहेत. हे नाले शहरातील पवना, मुळा आणि इंद्रायणी या नद्यांना जाऊन मिळतात. सर्वच नाले उघडे असल्याने या नाल्यांमध्ये राडारोडा, प्लॅस्टिक, भंगार आणि टाकाऊ साहित्य टाकले जाते. अनेक नागरिक घरगुती कचरा या नाल्यांमध्ये टाकतात. गाळ साचल्याने नाले अरुंद आणि उथळ होतात. परिणामी, पावसाळ्यात नाल्यांची वहनक्षमता कमी होते.



पावसाळ्याचे पाणी वाहून न गेल्याने ते साचून परिसरातील घर व दुकानांमध्ये शिरते. पावसाळ्यामध्ये शहरात पूरस्थिती निर्माण होऊ नये, म्हणून आयुक्त शेखर सिंह यांनी २२ मार्चला बैठक घेत ३१ मेपूर्वी नालेसफाई पूर्ण करण्याचा आदेश दिला होता. परंतु, मुदतीत नालेसफाई झाली नाही. शहर परिसरात मागील पंधरा दिवसांत चार ते पाच वेळा अवकाळी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नालेसफाईत काहीसा अडथळा निर्माण झाला होता. त्यानंतरही ९० टक्के नालेसफाई पूर्ण झाल्याचा दावा महापालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे. यंदा पाऊस वेळेत पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे नालेसफाई लवकर पूर्ण करण्याचे आव्हान आरोग्य विभागासमोर असणार आहे.

> आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत नालेसफाईचे काम सुरू असून, अंतिम टप्प्यात आले आहे. जेसीबी, पोकलेन व स्पायडर मशिनने नालेसफाई केली जात आहे. तसेच नालेसफाईपूर्वीचे व नंतरचे छायाचित्र घेतले जात आहे.
> **- विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड**

# जिल्हा प्रशासनात 'लेटर बॉम्ब'

## जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसेंचे राजकीय नेत्यांची घनिष्ठ संबंध : खेडच्या प्रांताधिकाऱ्यांचे निवडणूक आयोगाला पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांचे खेड विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदारांसोबत घनिष्ठ राजकीय संबंध असून ते त्यांच्या प्रभावाखाली काम करत आहेत, असा आरोप खेडचे प्रांताधिकारी तथा खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी जोगेंद्र कट्यारे यांनी करत मतमोजणीपूर्वी डॉ. दिवसे यांची बदली करावी. अन्यथा आगामी विधानसभा निवडणुकीत स्थानिक अधिकारी, कर्मचारी पारदर्शकपणे काम करू शकणार नाहीत, अशा आशयाचे पत्र कट्यारे यांनी महाराष्ट्राचे प्रधान सचिव, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी आणि केंद्रीय निवडणूक आयुक्त यांना बुधवारी पाठविले.लोकसभा निवडणुकीची मतमोजणी अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपली असताना या पत्रामुळे जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.



### इंदापूरच्या सहाय्यक निवडणूक अधिकाऱ्यांवरही आरोप

» जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघांतर्गत २१ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यामुळे जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी हे सतत कामात व्यस्त पाहिजेत. मात्र, तरीदेखील खेडचे विद्यमान आमदारांनी दिवसे यांची या काळात सातत्याने भेट घेतली. मतमोजणीसाठी सर्व सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू आहे. २८ मे रोजी बारामती मतदारसंघासाठी प्रशिक्षण असताना इंदापूर विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी हे प्रशिक्षणाला गैरहजर राहून माझ्या आणि तहसीलदार यांच्या कार्यालयावर छापे टाकण्यात व्यस्त होते, असेही कट्यारे यांनी पत्रात नमूद केले आहे.

डॉ. दिवसे यांची लोकसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती झाली. त्यांनी पुण्यामध्ये कृषी आयुक्त, क्रीडा आयुक्त, पीएमआरडीएचे महानगर आयुक्त, तसेच विविध पदांवर पुणे जिल्ह्यातच गेल्या अनेक वर्षांपासून काम केले आहे. त्यामुळे त्यांचे पुण्यातील राजकीय व्यक्तींशी घनिष्ठ संबंध असून त्यांचे वर्तन राजकीय नेत्यांना अनुकूल आहे. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता सुरू असताना त्यांच्या अधिकारात नसताना डॉ. दिवसे यांनी माझे भूसंपादनाचे अधिकार काढून घेतले आहेत. तसेच माझी यापूर्वी सुरू असलेल्या भूसंपादनाच्या कामाची चौकशी सुरू असताना स्वतंत्र चौकशी पथक नेमून २८ मे रोजी कोणतीही कल्पना न देता माझ्या आणि खेड तहसीलदार यांच्या कार्यालयावर छापा टाकून झडती घेतली. हे सर्व खेडच्या विद्यमान आमदारांना हाताशी धरून माझ्यावर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे. खेडचे स्थानिक विद्यमान आमदारांना मी आणि माझे तहसीलदार यांचे काम सुरू ठेवू द्यायचे नाही, म्हणून राजकीय आणि आर्थिक कारणास्तव आमची बदली करायची आहे. त्यामुळे डॉ. दिवसे यांनी अधिकृतपणे काम करण्याऐवजी काही राजकीय व्यक्तींचे मध्यस्थ म्हणून काम करत आहेत, असे गंभीर आरोप कट्यारे यांनी पत्रात केले आहेत.

### आमदाराचे नाव घेणे टाळले

» कट्यारे यांनी निवडणूक आयोगाला पत्र पाठविताना केवळ खेडचे विद्यमान आमदार म्हणून उल्लेख केला आहे. विद्यमान आमदारांना आगामी विधानसभा निवडणुकीतील मार्ग सुरळीत करून देण्यासाठी डॉ. दिवसे प्रयत्न करत आहेत. विद्यमान आमदारांना स्वत:ची कातडी वाचविण्यासाठी आणि राजकीय, आर्थिक इच्छा पूर्ण करण्यासाठी माझी बदली करण्याचे प्रयत्न आहेत. त्यानुसार दिवसे आणि आमदार माझ्या विरोधात असंविधानिकपणे पुरावे तयार करत आहेत. मतमोजणी (४ जून) पार पडल्यानंतर ते माझी बदली देखील करतील, असा उल्लेखही पत्रात करण्यात आला आहे.

# हिंजवडी आयटी पार्कमधून 37 कंपन्या पडल्या बाहेर

## आयटी पार्कमधील पायाभूत सुविधांची स्थिती दिवसेंदिवस खराब : 10 वर्षांत 37 कंपन्या बाहेर

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधून गेल्या १० वर्षांपासून कंपन्या बाहेर पडत आहेत. या माहिती-तंत्रज्ञान (आयटी) पार्कमधील पायाभूत सुविधांची स्थिती दिवसेंदिवस खराब होत आहे. याचबरोबर वाहतूककोंडी प्रचंड प्रमाणात वाढल्याने कंपन्या आयटी पार्कमधून बाहेर पडून दुसरीकडे स्थलांतरित होत आहेत. यामुळे रोजगारालाही मोठा फटका बसत आहे. हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशनने गेल्या १० वर्षांत ३७ कंपन्या बाहेर गेल्याचा दावा केला आहे. मात्र, नेमक्या किती कंपन्या स्थलांतरित झाल्या याची आकडेवारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे नाही.



हिंजवडी आयटी पार्क २५ वर्षांपूर्वी सुरू झाला. आता येथे रस्ते, पाणी, कचरा आणि वीज या पायाभूत सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. आयटी पार्कमध्ये १३९ कंपन्या कार्यरत आहेत. आयटी पार्कचा मागील काही काळात विस्तार झाला. मात्र, त्या तुलनेत पायाभूत सुविधा वाढल्या नाहीत. आता पायाभूत सुविधांची स्थिती दयनीय आहे. आयटी पार्कमधील रस्ते अरुंद असून, त्यांची स्थिती अतिशय खराब आहे. यामुळे येथे वाहतूककोंडी नित्याचीच बाब झाली आहे. या सर्व प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेक कंपन्या आयटी पार्कमधून राज्यात इतरत्र अथवा परराज्यांत स्थलांतरित होत आहेत.

याबाबत हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशनचे सचिव लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) योगेश जोशी म्हणाले, की गेल्या १० वर्षांपासून आम्ही सर्व यंत्रणांकडे पायाभूत सुविधांची स्थिती सुधारण्याची मागणी करीत आहोत. मात्र, त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही. गेल्या १० वर्षांत आमच्या सदस्य असलेल्या ३७ कंपन्या आयटी पार्कमधून बाहेर गेल्या आहेत. रस्ते खराब असून पावसाळ्यात त्यांची स्थिती दयनीय होते. त्यामुळे अपघाताचा धोका वाढतो. रस्त्यांना पदपथ नसून, पादचाऱ्यांना जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागतो. शासकीय यंत्रणांकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नाही.

### कोंडीमुळे आर्थिक भुर्दंड

» हिंजवडी आयटी पार्कमध्ये वाहतूक कोंडीमुळे अर्ध्या तासाच्या प्रवासासाठी दीड तास लागतो. वाहतूक कोंडीत दररोज कर्मचारी एक तास वाया घालवतात. आयटी कंपनीकडून सेवा देताना कर्मचाऱ्याचे तासाचे सुमारे २५ डॉलर आकारले जातात. एक तास वाया गेल्याने प्रत्येक कर्मचाऱ्यामागे २५ डॉलरचे नुकसान दररोज होत आहे, असा दावाही योगेश जोशी यांनी केला.

> हिंजवडी आयटी पार्कमधील पायाभूत सुविधांचा विषय विविध शासकीय यंत्रणांशी निगडित आहे. त्यामुळे या प्रकरणी लवकरच सर्व यंत्रणांची उच्चस्तरीय बैठक घेतली जाणार आहे. आयटी पार्कमधील समस्या सोडविण्यासाठी पावले उचलली जात आहेत.
>
> - अर्चना पठारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

# सर्व्हिस रस्त्यांचा श्वास कोंडला

## पिंपरी चिंचवड शहरात रस्त्यांलगत बेकायदा पार्किंग झोन : वाहतूक कोंडीत भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात अनेक रस्त्यांच्या कडेला दुचाकी, चारचाकी वाहने पार्क केली जातात. बहुतांश सर्व्हिस रस्ते हे पार्किंग झोन बनले आहेत. परिणामी वाहनांची कोंडी होत असून यातून मार्ग काढताना वाहनचालकांना मात्र कसरत करावी लागते आहे. हॉटेल, गॅरेज, दुकाने असताना दुसरीकडे फोरव्हीलर, रिक्षा, टेम्पो तसेच बेवारस वाहने पार्क केल्यामुळे सर्व्हिस रस्त्यांचा श्वासच कोंडला आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते प्रशस्त करण्यात आलेले आहेत; मात्र या रस्त्यावरून वाहने धावताना त्यांना रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या वाहनांचा अडथळाच जास्त होतो. पुणे -मुंबई महामार्गावर दापोडी ते निगडी दरम्यान ग्रेडसेपरेटर, बाजूला बीआरटी व त्यानंतर सर्व्हिस रस्ता आहे.

त्यामुळे रस्ता प्रशस्त दिसतो आहे; परंतु या रस्त्याच्या कडेला अनेक ठिकाणी दुचाकी आणि चारचाकी वाहने पार्क केलेली असतात. काही भागात अनधिकृतपणे थाटलेली हॉटेल, गॅरेज, दुकाने तसेच फोरव्हीलर, रिक्षा, टेम्पो तसेच बेवारस वाहने पार्क केल्यामुळे सर्व्हिस रस्त्याचा श्वासच कोंडला आहे.

चिखली स्पाइन रोडवरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी व आजूबाजूच्या सोसायटीमध्ये प्रवेश करण्यासाठी सर्व्हिस रोडचा वापर केला जातो; मात्र सध्या या सर्व्हिस रोडला बेकायदा पार्किंगचा विळखा पडला आहे. अनेक नागरिकादेखील स्पाइन रोडऐवजी सर्व्हिस रस्त्याचा वापर करत असतात; मात्र मार्गावर दुतर्फा केल्या जाणाऱ्या बेकायदा पार्किंगमुळे वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढतच आहे.

### चिंचवडगाव ते स्टेशन

चिंचवडगाव ते स्टेशन हा रस्ताही प्रशस्त आहे. हा रस्ता दुहेरी असून या रस्त्याच्या कडेला असेलल्या जागेवर मोठ्या प्रमाणात वाहने पार्क केली जातात. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहासमोर असलेल्या चौपाटीवर रात्रीच्या वेळी वाहनांची मोठी गर्दी असते. पार्सल किंवा खाऊन होईपर्यंत वाहने रस्त्यावरच उभी असतात.

### बॉटल नेक रस्ता

काळेवाडी येथून पिंपरीकडे येणाऱ्या रस्ता हा बॉटेल नेक बनला आहे. शगुन चौकात येईपर्यंत या रस्ताच्या कडेला असेलल्या पदपथावर विक्रेते आपले साहित्य विक्रीसाठी ठेवतात. त्यानंतर उरलेल्या जागेचा वापर वाहने पार्क करण्यासाठी होतो. येथील चौकांमध्ये वाहतूक पोलीस असतात; मात्र त्यांनाही वाहनचालक जुमानत नाहीत. त्यामुळे या रस्त्यावरून जाताना नागरिकांना वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो.



**पालिकेची पे अॅण्ड पार्क योजना फसली**

» पिंपरी चिंचवड शहरात महापालिकेच्या वतीने शहरातील उड्डाणपूल व ठिकठिकाणी पे अॅण्ड पार्कची सुविधा उपलब्ध करून दिली होती. दरम्यानच्या काळात त्यातील केवळ ४ ठिकाणी ही सुविधा सुरू होती; मात्र राजकीय हस्तक्षेप तसेच ठेकेदाराला ते परवडत नसल्याचे कारण देत ही योजना बासनात गुंडाळली आहे.

**पुरेशा पार्किंगचा अभाव**

» शहरात अनेक ठिकाणी बेकायदा वाहने पार्क केली जात असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. परिसरातील अनेक गृहसंकुले, हॉटेलांना पार्किंगची व्यवस्था (ठेवलीच) नसल्यामुळे अनेक दुचाकी, चारचाकी वाहने सर्व्हिस रस्त्यावर पार्क केली जातात. त्यात बेवारस वाहनांचीही भर पडत आहे.

# शहरातील भुयारीमार्गांची दुरावस्था, भुयारीमार्गंतील सुविधा अपुऱ्या

## वहातुक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी वापर, भुयारी मार्गाकाकडे पालिकेचे दुर्लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

रस्ते ओलांडताना छोटा-मोठे अपघात होवू नये. आणि वहातुक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी भुयारीमार्गाचा वापर केला जातो. मात्र जसा-जसा काळ गेला तसा-तसा भुयारी मार्गाकाकडे पालिकेचे दुर्लक्ष होत गेले. सध्या पिंपरी मधील काही भुयारी मार्गंची अवस्था पाहता, भुयारीमार्गंचा नेमका वापर कशासाठी असा प्रश्न पडत आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी तयार करण्यात आलेला पादचारी भुयारी मार्गमध्ये, आता तळीरामांचा आड्डा तयार होताना दिसत आहे. तसेच भुयारीमार्गंत जाळया तयार झाल्या आहेत. विषेशता चिंचवड स्टेशन येथील भुयारी मार्गात यापूर्वी शहराच्या सौंदर्यात भर पाडणाऱ्या स्थळांचे माहिती फलक लावण्यात आले होते.

परंतु त्यातील एकही फलक आता त्याठिकाणी दिसत नाही. त्यामुळे भुयारी मार्गची विद्रूपिकरणातही भर पडलेली दिसून येत आहे. शहरातील चिंचवड स्टेशन येथील, डी मार्टजवळील भुयारीमार्ग, काळेवाडीतील एम. एम. हायस्कूलजवळील भुयारीमार्ग आणि कै. संदिप वसंतराव शेवडे भुयारी मार्ग तसेच पिंपरीतील कै. किंमतराव ह.आसवाणी (कबड/डीपटटू) या भुयारीमार्गांची अवस्था बिकट झाल्याची दिसत आहे.

कै. किंमतराव ह.आसवाणी भुयारीमार्ग – या भुयारीमार्गत वीज दिवे पूरेसे नाहीत. भुयारी मार्गातील भिंतीचे रंगही खराब झाले आहेत. या भुयारी मार्गाचा वापर करताना, नागरिकांची गैरसोय होत आहे. अशीच अवस्था शहरातील अनेक भुयारीमार्गची झालेली दिसत आहे.



**काळेवाडीतील एम. एम. हायस्कूलजवळील पादचारी भुयारी मार्ग**

» या पादचारी भुयारी मार्गाजवळच शाळा व महाविद्यालय असल्याने या मार्गाचा वापर विद्यार्थी करत असतात. रात्रीच्या वेळी या मार्गात मद्यपींचा वावर असतो. त्यामुळे महिला आणि लहान मुलांना येथून ये-जा करणे भीतिदायक वाटते. मद्यपींनी येथील भिंतीवर तंबाखू खाऊन थुंकल्यामुळे भिंती घाण झाल्या आहेत.

**चिंचवड स्टेशन येथील भुयारीमार्ग**

» शहराच्या सौंदर्यात भर पाडणाऱ्या स्थळांचे माहिती फलक या भुयारीमार्गात लावण्यात आले होते. येथून ये-जा करणाऱ्या नागरिकांना या फलकांमुळे शहरातील पर्यटनस्थळांची माहिती मिळत असे. यामुळे भुयारी मार्गाचे त्यावेळी सुशोभिकरण झाले होते. परंतु आता त्याचेच विद्रूपिकरण झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मॉल आणि बँका आहेत. त्यामुळे या भुयारी मार्गात नागरिकांची सतत वर्दळ असते. तर भुयारीमार्गावरील वीज दिवे पुरेसे नाहीत. सीसीटीव्हीही नाही, तसेच त्यांचे काम व्यवस्थितपणे झाले नाही.

# पालखी मार्गावर घाणीचे साम्राज्य

## पुरंदर तालुक्यात अनेक ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य : प्रशासनाचे दुर्लक्ष



**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 965 आळंदी ते पंढरपूर संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर पुरंदर तालुक्यात अनेक ठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा काही दिवसावर येवून ठेपला असला तरीही प्रशासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. तालुक्यात दिवे घाट, बोरावके मळा, शिवरी, वाळुंज फाटा तसेच बेलसर फाटा इतर ठिकाणीही होठ्या प्रमाणात कचरा झाला असल्याने पालखी मार्ग गुदमरतोय असे चित्र निर्माण झाले आहे.

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सासवड व जेजुरी मार्ग पुढे प्रस्थान करीत आहे; परंतु पालखी सोहळ्याच्या स्वागतालाच म्हणजे दिवे घाटात कचरायुक्त घाणीच्या साम्राज्याने वारकरी व पालखी सोहळ्याचे स्वागत होणार की काय असा प्रश्न भेडसावत आहे.

> पालखी मार्गालगत असलेल्या कचर्‍यामुळे वारकर्‍यांना व नागरिकांना मोठ्या साथीच्या आजाराला सामोरे जावे लागेल.पालखी सोहळ्यात हे दृश्य योग्य नाही.निदान प्रचंड क्षेत्रावर वाहून जाणारे पाणी उताराला जमीनीत मुरवून रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवडीचे नियोजन होणे अत्यावश्यक आहे.
>
> **- कल्पना साळुंखे, विश्वस्त, ग्राम गौरव प्रतिष्ठान, खळद.**

दिवे घाटा मध्ये बहुतेक वेळा अज्ञात व्यक्ती कडून कचरा टाकला जातो या कचेऱ्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत आहे. दिवे घाटाच्या सौंदर्यावर मोठा आघात यामुळे होत आहे. तर याचा पायी चालत येणाऱ्या वारकर्‍यांना मोठा त्रास होऊ शकतो.त्यांचा आरोग्याचा मोठा प्रश्न समोर येवू शकातो.

सासवड पासून जेजुरीकडे येताना बोरावके मळा, शिवरी, वाळुंज फाटा व बेलसर फाटा याठिकाणी महत्त्वाचे व जास्त गर्दीचे पालखी विसावे आहेत. या परिसरात देखील मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे.त्यामुळे पालखी मार्ग नक्की मोकळा श्वास कधी घेणार असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

पाळखी मार्ग अलीकडील काळात अनेक समस्यांना तोंड देत पूर्णत्वाकडे निघाला आहे; परंतु करोडो रुपये खर्च करुन प्रशासनाकडून काहीच हालचाली होताना दिसत नाहीत.

### चांगावटेश्वर पालखी मार्गातही कचरा

» चांगावटेश्वर पालखी मार्गामध्ये सासवड ते कुंभारवळण रस्त्यावर असलेल्या ओढ्याच्या जवळ मोठ्या प्रमाणात कचरा व दुर्गंधी पसरली आहे.त्यामुळे नक्की पालखी मार्ग कसा रस्ता काढणार की प्रशासन तत्पर जागे होऊन साफ सफाई चे काम हाती घेणार का हा प्रश्न नागरिक विचारात आहेत.

### प्रशासनाकडून काहीच हालचाली नाहीत

» पाळखी मार्ग अलीकडील काळात अनेक समस्यांना तोंड देत पूर्णत्वाकडे निघाला आहे; परंतु करोडो रुपये खर्च करुन कचरा, वाहतूक कोंडी, वाहतुकीबाबत चुकीचे नियोजन तसेच वृक्ष लागवड याबाबत प्रशासनाकडून काहीच हालचाली होताना दिसत नाहीत. तर दुसऱ्या बाजुला हॉटेल वायवसायिक स्थानिक नागरिक हे देखील कचरा कोठे टाकावा याबद्दल गांभीर्याने विचार करताना दिसत नाहीत. अशा बेजबाबदार व्यावसायिक व नागरिकांवर कारवाई झाली पाहिजे, असेही ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

# पुणे पोलीस अल्पवयीन आरोपीची चौकशी करणार

## बाल न्याय मंडळाने दिली परवानगी, चौकशीच्या परवानगी मागणीचे पत्र दिले होते



**पुणे | प्रतिनिधी**

पोर्श कार अपघात प्रकरणी महत्त्वाची अपडेट आता पुणे पोलीस अल्पवयीन आरोपीची चौकशी करणार असल्याचे पुढे आलं आहे.

पुण्यातील कल्याणीनगर भागात एका अल्पवयीन मुलाने आलिशान पोर्श कारने दोघांना चिरडल्याची घटना काही दिवसांपूर्वीच घडली होती. हे प्रकरण अद्यापही चर्चेत आहे. याप्रकरणी आता रोज नवीन कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, आता पुणे पोलीस अल्पवयीन आरोपीची चौकशी करणार असल्याचे पुढे आलं आहे. बाल न्याय मंडळाने पुणे पोलिसांनी ही परवानगी दिली आहे.

एएनआयने पुणे पोलिसांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, याप्रकरणातील आरोपी अल्पवयीन असल्याने त्यांची चौकशी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी करणारे पत्र पुणे पोलिसांनी बाल न्याय मंडळाकडे दिले होते. त्यानुसार आता बाल न्याय मंडळाने पुणे पोलिसांनी आरोपीच्या चौकशीची परवानगी दिली आहे. उद्या पुणे पोलिसांकडून अल्पवयीन आरोपीची चौकशी करण्यात येणार आहे. बाल न्याय मंडळाने यासाठी २ तासांचा वेळ पुणे पोलिसांना दिला आहे. अल्पवयीन चालकाला बालसुधारगृहात ५ जूनपर्यंत ठेवण्यात आलं आहे.

### पुणे अपघात प्रकरणात आतापर्यंत काय कारवाई झाली?

» पुणे अपघातप्रकरणात मूळ आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्या वडिल आणि आजोबांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना आज पुणे जिल्हा न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तसेच या प्रकरणातील अल्पवयीन आरोपी मुलाच्या रक्ताच्या नमुन्यामध्ये फेरफार केल्याप्रकरणी ससून रुग्णालयाचे डॉ अजय तावरे, डॉ श्रीहरी हाळनोर आणि शिपाई अतुल घटकांबळे यांना ५ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. बी.जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. विनायक काळे यांनी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात न घेता संस्थाप्रमुख म्हणून या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे त्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आलं आहे.

### आरोपीच्या आईचाही समावेश असल्याची बाब पुढे आली

» या प्रकरणात आरोपीच्या आईचाही समावेश असल्याची बाब पुढे आली आहे. १७ वर्षीय आरोपीच्या आईने मुलाचे रक्त नमुने बदलण्यासाठी स्वतःचे रक्त ससून रुग्णालयाला दिले असल्याचे समोर आले आहे. रक्त नमुने बदलण्यामध्ये डॉ. श्रीहरी हळनोरचा प्रमुख सहभाग होता. हळनोरनेच आईचेही रक्त नमुने घेतले असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. डॉ. अजय तावरे आणि डॉ. हळनोर यांच्या अटकेनंतर त्या बेपत्ता झाल्या आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.